## वेध औरंगाबाद – एक आनंददायी अर्थपूर्ण प्रवास

***टेंडर केयर होम, औरंगाबाद*** ही एका ध्येय्यवेडया दांपत्यानी आनंददायी व अर्थपूर्ण शिक्षणासाठी सुरु केलेली शाळा. सौ. शैलजा व विंग कमांडर केकरे हयांनी आपले इंडीयन एअर फोर्स मधील चाकोरीबघ्द आयूष्य एका वळणावर मागे टाकले व शिकण्याचा आनंद देत राहणारी शाळा साधारण अठरा वर्षापूर्वी सुरु केली.

आनंददायी व अर्थपूर्ण शिक्षण हया त्यांच्या ब्रीद वाक्याला साजेसे विविध उपक्रम, जसे "आओ बच्चो तुम्हें दिखाये झांकी हिंदुस्तानकी" असे म्हणत – देश विदेशात पाच वर्षां पासून पूढील विद्यार्थ्यांच्या सहलीचे आयोजन, कार्यशाळा, गंमत जत्रा असे अनेकविध ऊपक्रम चालु असतानाच एका मोठया वळणावर डॉ. आनंद नाडकर्णी शी भेट झाली.

डॉ. आनंद नाडकर्णी हे एक हरहुन्नरी, बहुआयामी व्यक्तीमत्व, पण व्यवसायाने ते डॉक्टर. त्यांची आय.पी.एच. ही ठाण्यातली संस्था मानसिक आरोग्याचा आधारस्तंभ तर आहेच, पण आपल्या सतत शिकण्याच्या, नाविन्याचा वेध धेण्याच्या प्रवासात पुरक आहे हे जाणल्यापासून नवीन पिढी धडविण्यासाठी TCH व IPH चा प्रवास आजतगायत एकत्र सुरु आहे.

डॉ. आनंद नाडकर्णी व त्यांचे सहकारी शालेय मुलांसाठी, पालकांसाठी व शिक्षकांसाठी कार्यशाळा, गंमत जत्रा, ठाण्याचा वेध इत्यादी गोष्टी हया TCH च्या परीवारासाठी नित्य नियमाने होत असतात व हे होत असतानाच 2006 सालच्या एप्रिल मध्ये पहिली दोन दिवसीय वेध व्यवसाय प्रबोधन परिषद ही मोठया उत्साहात पार पडली व औरंगाबाद शहरात एका मोठया पर्वाला सुरुवात झाली.

TCH च्या सर्व समावेशक धोरणानुसार येथेही विद्यार्थी, शिक्षक व पालक हयांनी त्याचे आयोजन केले होते व ते करत आसताना हे सर्व ***"वेध"*** चे अविभाज्य धटक झाले.

***"वेध"*** चे नियोजन करत असताना वेगवेगळया क्षेत्रातील, विविध व्यवसाय करणारी, जिवन जगणारी व जागवणारी अशी अनेकविध व्यक्तीमत्वे भेटत पण प्रत्येक यशस्वी व्यक्तीमत्व अतिशय व्यस्त असते, खूप निर्णायक जबाबदारी पेलत असते. आणि असे करत असताना भारताच्या कानाकोप–यातून औरंगाबादला येत असतात.

.... 2

***"ते येणार म्हणाले " म्हण्जे येणार हे आता अनूभवातून जरी कळले असले तरी ते व्यासपीठावर पोहचेपर्यंत ज्या दिव्यातून जावे लागते ते अवर्णणीय असते.***

सोनम वांगचुक लेहहून असेच लष्करी विमानातून प्रवास करत पोहचतात  तर इशु सिंधु सारखे तडफदार IPS officer, election duty संभाळून फक्त औरंगाबादच्या विद्यार्थ्यांना भेटण्यासाठी मजल दरमजल करत वेळेवर पोहचतात.

असे अनेकविध अनुभव देत, असंख्य गोष्टी शिकवून जाणारे वेधचे आयोजन म्हण्जे एखाद्या प्रथितयश विद्यापीठाची एम.बी.ए. ची पदवीच.

***"वेध"*** चे नियोजन व आयोजन करत असताना जीवन जगण्याचा दृष्टीकोन बदलतो असे वेधच्या सर्वच आयोजकांना वाटते. वेधमध्ये आलेला प्रत्येक वक्ता तुम्हाला खुपच वेगवेगळे पण भरभरुन दान देऊन जाता व या जन्मावर या जगण्यावर शतदा प्रेम करावे असे वाटत असताना मनात एक ऊत्साहाचा अखंड तेवणारा दिप प्रज्वलीत करतो.  त्या मंद –अखंड प्रकाशात आंम्ही पुढच्या वेधच्या तयारीला लागतो.

औरंगाबाद तसे दुर्लक्षित शहर, महाराष्ट्रातील कमी विकसीत भागाचे प्रतिनिधीत्व करते. "फक्त शालेय मुलांसाठी" असे उपक्रम सर्वत्र कमीच असतात व औरंगाबादला तर ते नव्हतेच त्यामुळे औरंगाबादच्या संस्कृतीक व शैक्षणिक विश्वात मुलांसाठी असलेल्या वेध ने एकप्रकारे क्रांतीच केली आहे. गेल्या दहा वर्षात वेध ने औरंगाबाद व आजुबाजुच्या ग्रामिण परीसरातील मुलांमध्ये व नागरिकांमध्ये आपले अढळ स्थान निर्माण केलेले आहे.

***"वेध" परिषद*** संपवून जाताजाताच आता 'पुढच्या वर्षी कोण येणार'? असे प्रश्न विचारत निरोप धेणारे औरंगाबादकर उत्कंठतेने पुढील वर्षीच्या वेधची वाट बधत असतात.

म्हणूनच ***"वेध"*** औरंगाबाद आपणां सर्वांना 8 जानेवारी 2017, रविवारी 'उत्सव जीवनाचा' साजरा करायला आग्रहाचे आंमत्रण देत आहे.

,,,,,,,,,,